# श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ
# वैद्यकीय मंडळ

१. **स्थापना** :– शासन निर्णय क्रमांक एमएजी१०८९/२८७३/आरोग्य-९सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई दि.०८ मे १९९० अन्वये करण्यात आलेली आहे.

२. **सदस्य** :– (अ) नियमित
१ प्राध्यापक व विभागप्रमुख,औषधवैद्यकशास्त्र
२ प्राध्यापक व विभागप्रमुख,शल्यचिकित्साशास्त्र
३ प्राध्यापक व विभागप्रमुख,नेत्रशास्त्र

यापैकी सेवाजेष्ठतेनुसार एक सदस्य अध्यक्ष म्हणुन कामकाज बधतात व नियमित सदस्यांकडून वैद्यकीय मंडळा समक्ष उपस्थित सर्व अधिकारी /कर्मचारी रुग्णांची तपासणी करण्यात येते.

(ब) वैकल्पिक :–
१ प्राध्यापक व विभागप्रमुख स्त्रिरोग व प्रसुतिशास्त्र
२ प्राध्यापक व विभागप्रमुख,अस्थिव्यंगापेचारशास्त्र
३ प्राध्यापक व विभागप्रमख,नाक कान घसाशास्त्र
४ प्राध्यापक व विभागप्रमुख,मनोरुग्णशास्त्र
५ आवश्यकतेनुसार इतर विषयांचे तज्ञ

या सदस्यांकडे त्यांचे विषयाची संबंधीत असलेले रुग्णच पाठविण्यात येतात.

३. शासन निर्णयानुसार या वैद्यकीय मंडळा मार्फत केंद्र / राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी शासनाचे अंगीकृत व्यवसाय, महामंडळे, सेवानिवृत्त कर्मचारी या शिवाय शासकीय सेवेत नियुक्ती प्राप्त झालेल्या उमेदवारांची तपासणी त्यांचे संबंधीत कार्यालयाने वैद्यकीय मंडळास पत्राद्वारे केलेल्या विनंती नुसार तपासणी करण्यात येते. कोणत्याही व्यक्तीला आपल्या मताने वैद्यकीय मंडळाकडे अर्ज करुन तपासणी करता येत नाही. वैद्यकीय मंडळा मार्फत अधिकारी / कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणीही त्यांचे सेवाप्रवेश पात्रता, वैद्यकीय रजा मंजुरी व सेवानिवृत्त अंशराशीकरण या सबंधाने करण्यात येते.

४. रुग्ण तपासणीचे दिवस व वेळा :– ही तपासणी महिन्यातुन दोनदा (दर पंधरा दिवसात एकदा ) करण्यात येते. तपासणीचा दिवस उमेदवारांना त्यांचे कार्यालया मार्फत ८ ते १० दिवस पुर्वी कळविण्यात येतो. तपासणी करीता आधीच नोंदणी करुन तारीख घ्यावी लागते.

सदर तपासणी बाहयरुग्ण विभागात संबंधीत सदस्यांच्या दालनामध्ये ११ ते ०२ वाजे पर्यत करण्यात येते.

विशेष तपासण्या व चाचण्या त्याच दिवशी पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. गरज भासल्यास अतिविशीष्ठ तपासणी जसे की, सि.टी.स्कॅन या करीता सबंधीत विभाग रुग्णाला वेगळी तारीख देतात.

वरिल ठरलेल्या दिवसा व्यतिरिक्त इतर दिवशी वैद्यकीय मंडळाद्वारे तपासणी केल्या जात नाही.

५. **शुल्क :-** वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासकीय शुल्क रु.५०/-
तज्ञ डॉक्टरांचा सल्ला, स्टेशनरी व टपालखर्च रु.३०/-

एकुण रु. ८०/-

रक्ताच्या व इतर चाचण्यांचे शासकीय नियमानुसार शुल्क आकारण्यात येते.

६. रुग्णांची तपासणी दिलेल्या तारखेला पुर्ण करुन चाचण्या व विशेष तपासणी यांचे अहवाल प्राप्त झाल्यावर रुग्णांच्या अहवाल त्वरित कार्यालयास पोस्टाने पाठविण्यात येतो. याला साधारणपणे ८ ते १० दिवस लागतात.

काही चाचण्या / तपासण्या अपुर्ण राहिल्यास किंवा रुग्णाने त्यांचे आजाराचे कागदपत्रांची पुर्तता न केल्यास अहवाल पाठविण्या विलंब लागु शकतो.

कोणत्याही परिस्थितीत वैद्यकीय मंडळाचा अहवाल उमेदवार / रुग्णांच्या हाती देण्यात येत नाही.

७. वैद्यकीय मंडळाद्वारे रुग्णांच्या तपासणीचे अहवाल तसेच विविध केलेल्या चाचण्यांचे निष्कर्ष तसेच लागणारा औषधोपचार याची माहिती / सल्ला रुग्णाला देण्यात येत नाही.

८. आरोपी / कैदी तसेच न्यायालयीन प्रकरणातील रुग्णांची तपासणी या वैद्यकीय मंडळाद्वारे करण्यात येत नाही. त्या करीता पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहे.

९. या वैद्यकीय मंडळाद्वारे सर्व साधारण जनतेला अपंगत्वाचे टक्केवारी बाबत प्रमाणपत्र देण्यात येत नाही. त्या करीता स्वतंत्र पर्यायी मंडळ उपलब्ध आहे.

१०. गोपनीयता :- वैद्यकीय मंडळापुढे तपासणी करीता आलेल्या अधिकारी / कर्मचारी रुग्णांच्या करण्यात आलेल्या तपासण्यांचे अहवाल, निष्कर्ष इत्यादी गोपनीय ठेवण्यास येतात.

११. सर्व साधारण प्रक्रिया :-

१) वैद्यकीय मंडळा समक्ष तपासणी करीता बोलाविलेल्या उमेदवारांनी तपासणीचे दिवशी सकाळी ९.०० वाजे पर्यत उपस्थित राहावे.
२) सोबत स्वतःचे ३ पासपोर्ट फोटो,ओळखपत्र (मतदानाचे कार्ड, पॅनकार्ड, ड्रारव्हींग कोणतेही एक ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे. या शिवाय रुग्णांची तपासणी

केल्या जात नाही.

३) त्याचप्रमाणे रुग्णांनी पुर्वी घेतलेल्या औषधोपचाराचे कागदपत्र,केलेल्या चाचण्यांचे अहवाल आणि डॉक्टरांनी विहित केलेला औषधोपचार इत्यादी सर्व कागदपत्रे सोबत आणावेत.

४) वैद्यकीय तपासणी करीता आलेल्या  सर्वअधिकारी / कर्मचारी रुग्णांना वर नमुद नियमित सदस्यांकडे तपासणी करावी लागते. त्यांनी इतर दुस-या वैकल्पिक तज्ञांचा सल्ला घेण्याचे नमुद केलेले असल्यास त्यांच्याकडील तपासणी पुर्ण करुन तसेच सर्व चाचण्या पुर्ण करुन संपुर्ण अभिलेख वैद्यकीय मंडळाचे कार्यालयात जमा करणे अनिवार्य आहे.

अध्यक्ष
वैद्यकीय मंडळ
श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
यवतमाळ